**L. A. BILL No. XCVIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१७ चा महा. ६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ८ मधील, पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ६.

" (६) राज्य शासनाला, राज्य शासनाच्या उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यामार्फत कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठाची तपासणी करवून घेण्याचा अधिकार असेल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मधील, पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (५) वित्त व लेखा अधिकाऱ्यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा नियत वयोमान पूर्ण करेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल इतक्या कालावधीसाठी करण्यात येईल आणि तो या प्रयोजनार्थ घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशीवरील निवडीद्वारे, तो ज्या विद्यापीठात काम करत असेल अशा विद्यापीठात, पाच वर्षांच्या फक्त एकाच कालावधीसाठी पुनर्नियुक्तीकरिता पात्र असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७१ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७१ मध्ये, खंड (२१) मधील, "च्या पोटकलम (७)" या मजकुराऐवजी, "ची पोट-कलमे (६) व (७)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ७७ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ख-एक) सर्वसमावेशक सम्यक योजनेत वेळोवेळी फेरबदल करणे;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ९८ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९८ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "ज्यामध्ये प्रत्येक बाबीचे स्वतंत्र मूल्य एकावेळी दहा लाखांहून अधिक असेल अशा," हा मजकूर वगळण्यात येईल;

(२) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(६) विद्यापीठाच्या सर्व खरेदीशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी, एकरूप परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील.";

"(३) पोट-कलम (७) मधील, "परिनियमांद्वारे" या मजकुराऐवजी, "एकरूप परिनियमांद्वारे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०० ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०० मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभवसिद्ध व गुणवंत अशा दहा ते बारा वास्तुविशारदांची आणि इतर विशेषीकृत सल्लागारांची, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची, संरचनात्मक सल्लागारांची, कार्यकारी अभिकरणांची एक नामिका तयार करील आणि तिला व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेईल;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३५ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहितेचे" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची ख मधील, भाग दोनमध्ये पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या अनुसूची ख ची सुधारणा.

| | | | |
|---|---|---|---|
| “ १. | वारणा विद्यापीठ, वारणानगर, कोल्हापूर. | तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, वारणानगर, कोल्हापूर. | (१) यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, कोल्हापूर ; आणि<br>(२) तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर, कोल्हापूर.”. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त प्रतिनिधित्व, उच्च शिक्षणाची अभिवृद्धी, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) अधिनियमित केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता आणि विद्यापीठाचे प्रशासन व संरचना याचे बळकटीकरण करण्यासाठी आणि उच्च शिक्षणाच्या व संशोधनाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यास सक्षम बनविण्याकरिता उक्त अधिनियमामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

**२.** प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) राज्य शासनाच्या उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठाची तपासणी करण्याचा अधिकार देण्याची तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ८ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे ;

(दोन) पाच वर्षांच्या आणखी एका मुदतीसाठी वित्त व लेखा अधिकाऱ्याची पुनर्नियुक्ती करण्याची तरतूद करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम १८ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे ;

(तीन) विद्यापीठाने सादर केलेल्या सर्वसमावेशक सम्यक योजनांमध्ये वेळोवेळी फेरबदल करण्याकरिता महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगास अधिकार प्रदान करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ७७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे ;

(चार) उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये घटित केलेले वारणा विद्यापीठ, वारणानगर, कोल्हापूर, हे समूह विद्यापीठ दाखल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या अनुसूची ख च्या भाग दोनमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

उक्त अधिनियमाची कलमे ७१, ९८, १०० व १३५ यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे देखील शासनास वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक ८ डिसेंबर, २०२५.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२५ चे वि.स.वि. क्र. ९८.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२५

## (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे)

## ( सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)

**१.** ते **७.** ** ** ** **

**८.** (१) ते (५) ** ** ** ** राज्य शासनाचे विद्यापीठांवर नियंत्रण असणे.

(६) राज्य शासनाला, सह संचालक, उच्च शिक्षण किंवा तंत्र शिक्षण याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यामार्फत कोणत्याही संलग्न, संचालित किंवा स्वायत्त महाविद्यालयाची, मान्यताप्राप्त परिसंस्थेची किंवा विद्यापीठ विभागाची तपासणी करवून घेण्याचे अधिकार असतील.

(७) ते (८) ** ** ** **

**९. ते १७.** ** ** ** **

**१८.** (१) ते (४)** ** ** ** वित्त व लेखा अधिकारी.

(५) वित्त व लेखा अधिकाऱ्यांची नियुक्ती ही, पाच वर्षांच्या मुदतीसाठी किंवा त्याचा नियत सेवावधी पूर्ण होईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल, तोपर्यंतच्या मुदतीसाठी असेल आणि तो त्या विद्यापीठात पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही.

(६) ** ** ** **

**१९. ते ७०.** ** ** ** **

**७१.** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, परिनियमांमध्ये पुढे दिलेल्या सर्व किंवा यांपैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :— परिनियम व त्याचे विषय.

(१) ते (२०) ** ** **

(२१) कलम ९८ च्या पोट-कलम (७) अन्वये खरेदीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(२२) ** ** ** **

**७२.** ते **९७.** ** ** ** **

**९८.** (१) ज्यामध्ये प्रत्येक बाबीचे स्वतंत्र मूल्य एकावेळी दहा लाखांहून अधिक असेल अशा, विद्यापीठाच्या खरेदीच्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल. खरेदी समिती.

(२) ते (५) ** ** ** **

(६) जेथे प्रत्येक बाबीची विशिष्ट किंमतही एका वेळी दहा लाखांपेक्षा अधिक नसेल तेथे अशा बाबींच्या बाबतीत विद्यापीठाच्या सर्व खरेदीसंबंधीच्या सर्व बाबी ह्या, परिनियमांमध्ये विहित करण्यात येतील.

(७) खरेदी समितीचे अधिकार व कर्तव्ये आणि तिच्या बैठकांची कार्यपद्धती परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**९९.** ** ** ** **

**९९क.** ** ** ** **

इमारत व बांधकाम समिती.

**१००.** (१) ते (४) ** ** **

(५) इमारत व बांधकाम समिती,—

(क) ते (घ) ** ** ** **

(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभवसिद्ध व गुणवंत अशा दहा ते बारा वास्तुविशारदांची आणि इतर विशेषीकृत सल्लागारांची एक नामिका तयार करील आणि तिला व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेईल. अशी नामिका कुलपतींच्या मान्यतेच्या अधीन असेल व त्याला योग्य वाटतील असे फेरबदल त्यात करता येतील ;

(च) ते (ढ) ** ** **

(६) ते (८) ** ** ** **

**१०१.** ते **१३४.** ** ** ** **

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

**१३५.** (१) विद्यापीठाचे लेखे, दुबार नोंद लेखांकन पद्धतीच्या व तत्त्वाच्या आधारे ठेवण्यात येतील आणि अनुसरावयाची लेखांकन पद्धती, राज्य शासनाने विहित केलेल्या महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहितेचे अनुपालन करणारी व्यापारी लेखांकन पद्धती असेल.

(२) ते (५) ** ** ** **

**१३६** ते **१४८.** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९८.]**

**[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**[विधानसभेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव-१,

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.

एचबी ११९८—२